# मराठी भाषा गौरव दिवस

## २७ फेब्रुवारी - १ मार्च, २०१८

**"लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,**

**एवढ्या जगात माय मानतो मराठी"**

महात्मा नाईट डिग्री महाविद्यालयाच्या "मराठी वाङ्मय मंडळाने" २७ फेब्रुवारी म्हणजेच कविवर्य कुसुमाग्रज जयंती जोमात साजरी केली. २७ फेब्रुवारीला सुरु झालेला हा सोहळा १ मार्च २०१८ रोजी संपन्न झाला.

प्रा. अनया मार्कंडेय आणि प्रा. तुषार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या तीन दिवसात विविध कार्यक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी खालील स्पर्धा घेण्यात आल्या.

१. निबंध लेखन

२. कविता लेखन

वरील स्पर्धांसाठी देण्यात आलेले विषय होते,

१ माझी मराठी, माय मराठी

२. मराठी भाषा आणि सोशिअल मिडिया

दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी खालील स्पर्धा घेण्यात आल्या.

१. मराठी कविता वाचन लेखन

२. गायन

स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दिनांक १मार्च, २०१८ रोजी या सोहळ्याचे समारोपण करण्यासाठी, मराठी रंगभूमीवरील तसेच छोट्या पडद्यावरील सुप्रसिद्ध अशा दोन व्यक्तिमत्वन्ना आमंत्रित करण्याल आले होते.

श्री. प्रशांत निगडे आणि कु. पूजा रायबागी.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन द्‌वितीय वर्ष वाणिज्य शाखेच्या कु. प्रियांका गायकवाड आणि प्रथम वर्षाच्या कु.स्नेहा सोनावणे यांनी मराठमोळ्या अंदाजात केले.

दीप प्रज्वलनाने कार्क्रमाची सुरुवात झाली. कु. दिव्या अम्बिरे हिने गणपती वंदना सदर केली. प्राचार्य डॉ. पद्मा रंगन यांनी  पाहुण्यांचे व विद्‌यार्थ्यांचे स्वागत केले.

विविध नृत्याविष्कार, गाणी, आणि कविता वाचन या सर्वांमुळे कार्क्रमाला रंगत आली.

परंतु कट्‌याला खरा रंग चढवला ते प्रमुख पाहुण्यांनीच.

कु. पूजा रायबागी यांनी "पु. ल. देशपांडे" च्या "ती फुलराणी" मधील एक प्रसंग सादर करून विद्‌यार्थ्यांना स्तब्ध केले. तर श्री. प्रशांत निगडे यांनी त्यांच्या भन्नाट मिमिक्री ने मोठा हशा उडवला.

दोघांनीही विद्‌यार्थ्यांचे त्यांचे सादरीकरण व प्रतिसादासाठी तोंडभरून कौतुक केले.

सर्व स्पर्धांमधील विजेत्यांचा पाहुण्यांच्या व प्राचार्यांच्या हस्ते मराठी पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. अनया मार्कंडेय आणि प्रा. तुषार पवार यांनी आभार प्रदर्शन केले.

राष्ट्रगीताने कार्याक्रमची सांगता झाली.

***